# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

विविध अनुदान संस्थांकडून प्रकल्पासाठी/अनुदान संस्थेकडील योजनांसाठी विद्यापीठामधील प्रकल्प प्रमुख/विभाग यांना अनुदान प्राप्त होत असते. आर्थिक वर्ष २०२२—२३ मध्ये काही अनुदान संस्थांनी प्रकल्प प्रमुखांना वैयक्तीक ई—मेलद्वारे अनुदान प्राप्त करणे, खर्च करणे यासाठी अनुदान संस्थेकडील योजनानिहाय नविन झीरो बॅलन्स सबसिडी खाते अनुदान संस्थेने नमूद केलेल्या बँकेमध्ये चालू करण्यास सांगितलेले आहे.

तरी असा ई—मेल प्रकल्प प्रमुख/विभागप्रमुख यांना अनुदान संस्थेकडून प्राप्त झाल्यास त्यासंबंधीची पूर्ण माहिती घेऊन जसे की खाते कोणत्या नावाने हवे, कोणत्या बँकेमध्ये सुरु करावे, कोणत्या प्रकल्पासाठी हवे किंवा त्यांच्याकडील योजनेअंतर्गत विद्यापीठाने एकच खाते सुरु करावे किंवा कसे, प्रकल्पाचे पूर्ण शिर्षक, अनुदान कोड, स्वत:चा ई—मेल पत्ता इ.दी. स्पष्ट नमूद करून अशा आशयाचे पत्र प्रकल्प प्रमुख/विभागप्रमुख/संचालक यांनी वित्त व लेखा अधिकारी यांना लिहून त्यास अनुदान संस्थांकडून प्राप्त झालेली सर्व कागदपत्रे जोडावीत. संबंधित पत्र बुक युनिटकडे द्यावे. बुक युनिट ने खाते सुरु केले की त्या खात्याची संपूर्ण माहिती, अनुदान संस्था तसेच विभागाकडून प्राप्त सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती हे बुक युनिट अनुदान कक्षास देतील. अनुदान कक्ष, संबंधित खाते पी.एफ.एम.एस. या संकेतस्थळावर आवश्यक योजनेअंतर्गत नोंदणी करेल आणि त्याचा स्क्रीनशॉट तसेच खाते माहिती आपणांस तसेच अनुदान संस्थेस ई—मेलद्वारे कळवतील. आपणांस

अनुदान मंजूर झाल्याचे पत्र प्राप्त झाल्यानंतर ते त्वरित अनुदान कक्षामध्ये दयावे. अनुदान प्राप्त झाल्याचा ई—मेल हा अनुदान कक्षामार्फतच आपणांस प्राप्त होईल.

त्यानंतर आपण अनुदान संस्थेशी संपर्क करुन पुढील प्रक्रीयेची माहिती घेऊन आपल्या विभागाशी संबंधित वित्त विभागामधील सहा. कक्षाधिकारी/कक्षाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

सीएमए चारुशीला गायके
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे ४११००७
जावक क्र. वित्त/२०२२—२३/1009
दिनांक १०/११/२०२२

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:**

मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ) यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागातील शिक्षकांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणावे.